**ठळक बातम्या**

- राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांच्या हस्ते विविध मान्यवरांचा पद्म पुरस्कारानं गौरव
- पहलगाम हल्ल्याचा कठोर शब्दात निषेध करणारा ठराव जम्मू - काश्मीर विधानसभेच्या विशेष अधिवेशनात मंजूर
- मुंबईतल्या २६/११ हल्ल्याच्या कटात सामील असलेल्या तहव्वुर राणाला आणखी १२ दिवस पोलीस कोठडी
- पुस्तकं आणि अभ्यासाचं साहित्य वाजवी दरात पाठवण्यासाठी टपाल विभागाची विशेष सुविधा

**आणि**

- राफेलच्या मरीन प्रकारची २६ लढाऊ विमानं खरेदी करण्यासाठी भारताचा फ्रान्सबरोबर करार

**<><><><><>**

राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांच्या हस्ते आज संध्याकाळी राष्ट्रपती भवनात आयोजित समारंभात पद्म पुरस्कारांचं वितरण करण्यात आलं. यंदाच्या प्रजासत्ताक दिनी सरकारनं १३९ जणांना पद्म पुरस्कार जाहीर केले होते. त्यामध्ये ७ पद्मविभूषण, १९ पद्मभूषण आणि ११३पद्मश्री पुरस्कारांचा समावेश आहे. प्रख्यात व्हायोलिनवादक डॉक्टर एल सुब्रमण्यम, डॉ दुव्वूर नागेश्वर रेड्डी यांना पद्मविभूषण पुरस्कारानं गौरवण्यात आलं. प्रसारभारतीचे माजी अध्यक्ष आणि ख्यातनाम संपादक ए सूर्यप्रकाश, चित्रपट अभिनेते नंदमुरी बालकृष्ण, अजित कुमार, हॉकीपटू श्रीजेश यांना पद्मभूषण पुरस्कार देण्यात आला. राज्यातल्या मारुती चितमपल्ली, वासुदेव कामत, चैतराम पवार यांच्यासह पवनकुमार गोयंका, क्रिकेटपटू रविचंद्रन अश्विन, शालीनीदेवी होळकर, अरुंधती भट्टाचार्य, पंडित रोनू मुजुमदार, जसपिंदर

नरुला कौर, महामहीम शेखा अल सबाह, लिबिया लोबो सरदेसाई यांना पद्मश्री पुरस्कार प्रदान करण्यात आला.

<><><><>

संरक्षण मंत्री राजनाथ सिंह  यांनी आज नवी दिल्लीत प्रधानमंत्री मोदी यांची त्यांच्या निवासस्थानी भेट घेतली. पहलगाम दहशतवादी हल्ल्याच्या पार्श्वभूमीवर झालेल्या या भेटीत त्यांच्यामध्ये सुमारे ४० मिनिटं चर्चा झाली.

<><><><>

पहलगाम दहशतवादी हल्ल्याच्या पार्श्वभूमीवर भारत सरकारने १६ पाकिस्तानी यू ट्यूब वाहिन्यांवर बंदी घातली आहे. डॉन न्यूज, एरी न्यूज, आणि जिओ न्यूज या वाहिन्यांचा त्यात समावेश आहे. भारत, भारतीय सैन्य आणि सुरक्षा यंत्रणांबद्दल प्रक्षोभक, खोटी आणि दिशाभूल करणारी माहिती प्रसारित केल्याबद्दल ही कारवाई करण्यात आली. या वाहिन्यांचे एकूण सहा कोटीहून अधिक नोंदणीकृत प्रेक्षक आहेत.

<><><><>

पहलगाम हल्ल्याचा कठोर शब्दात निषेध करणारा ठराव आज जम्मू - काश्मीर विधानसभेने विशेष अधिवेशनात मंजूर केला. या हल्ल्याच्या पार्श्वभूमीवर मंत्रिमंडळाच्या विनंतीवरुन नायब राज्यपालांनी हे अधिवेशन बोलावलं होतं. हा अतिशय क्रूर, निर्घृण, अमानुष आणि भ्याड हल्ला काश्मीरियतवर, तसंच संविधानाच्या एकता, शांती आणि सलोख्याच्या तत्वांवर झाला असल्याचं या ठरावात नमूद केलं आहे. हल्ल्यात बळी पडलेल्यांप्रति वचनबद्धता व्यक्त करुन त्यांच्या कुटुंबियांचं सांत्वन केलं आहे. पर्यटकांचा जीव वाचवताना  मरण पावलेल्या सय्यद आदिल हुसैनच्या शौर्याला सभागृहाने अभिवादन केलं.   काश्मीरमधे प्रथमच दहशतवादाला उघड आणि उत्स्फूर्तपणे विरोध होत असल्याचं प्रतिपादन जम्मू-काश्मीरचे मुख्यमंत्री ओमर अब्दुल्ला यांनी केलं. हल्ल्याच्या प्रत्युत्तरात

केंद्रसरकारने राजनैतिक स्तरावर घेतलेल्या निर्णयांना सभागृहाने पाठिंबा जाहीर केला. उपमुख्यमंत्री सुरिंदर चौधरी, पीपल्स कॉन्फरन्सचे नेते सज्जाद गनी लोन, भाजपाचे सुनील शर्मा, काँग्रेसचे गुलाम अहमद मीर, सीपीआय एम चे एम वाय तारिगामी आणि वाहीद उर-रहमान यांनीही चर्चेत भाग घेतला.

**<><><><><>**

छत्तीसगडमधल्या बिजापूर जिल्ह्यातल्या चोवीस माओवाद्यांनी आज आत्मसमर्पण केलं. यातल्या १४ जणांवर २८ लाख ५० हजार रुपयांचे इनाम जाहीर करण्यात आले होते. सरकारच्या पुनर्वसन योजनेनुसार आत्मसमर्पण केलेल्या माओवाद्यांना प्रत्येकी ५० हजार रुपयांचा धनादेश देण्यात आला. या वर्षात बिजापूर जिल्ह्यातल्या दोन हजार माओवाद्यांनी आत्मसमर्पण केलं आहे.

**<><><><><>**

मुंबईतल्या २६/११ हल्ल्याच्या कटात सामील असलेल्या तहव्वुर हुसेन राणाला राष्ट्रीय तपास संस्थेने आज विशेष न्यायालयासमोर हजर करून वाढीव पोलीस कोठडीची मागणी केली होती. त्यानुसार न्यायालयाने अजून १२ दिवसांची पोलीस कोठडी वाढवून दिली आहे. राणा गेले १८ दिवस राष्ट्रीय तपास संस्थेच्या ताब्यात होता आणि त्यादरम्यान मुंबई पोलिसांनीही त्याची चौकशी केली होती. चौकशीदरम्यान राणाने सहकार्य केलं नाही तसंच उडवाउडवीची उत्तरं दिल्याचं पोलिसांनी म्हटलं होतं .

**<><><><><>**

पहलगाम इथल्या दहशतवादी हल्ल्याच्या पार्श्वभूमीवर गुजरातमधे अवैधरित्या राहणाऱ्या बांगलादेशी नागरिकांचा शोध घेण्यासाठी व्यापक शोधमोहीम राबवली जात आहे. अहमदाबादमधे अवैधरित्या राहणाऱ्या चारशे संशयितांना पकडण्यात आलं आहे. शहरातले बेकायदेशीर बांधकामं पाडण्याचे आणि बेकायदेशीर वीज जोडणी तोडण्याचे आदेश अहमदाबादचे पोलीस आयुक्त जी एस मलिक यांनी दिले

आहेत. मोरबी इथं दहा बांगलादेशी नागरिकांना पोलिसांनी ताब्यात घेतलं. नवसारी, जलालपोर, गंदेवी, चिखली, बिलीमोरा आणि खेरगाम मधेही शोधमोहीम सुरू आहे.

**<><><><>**

देशभरात पुस्तकं आणि अभ्यासाचं साहित्य वाजवी दरात टपालाने पाठवता यावं याकरता ज्ञान पोस्ट ही नवीन सेवा सुरु होणार आहे. केंद्रीय दूरसंवाद मंत्री ज्योतिरादित्य शिंदे यांनी आज नवी दिल्लीत पत्रकारपरिषदेत ही माहिती दिली. येत्या १ मे पासून ही सेवा सुरु होणार असून त्यात टपालाने पाठवलेल्या साहित्याचा माग काढण्याची सुविधा आहे. सर्व स्तरातल्या व्यक्ती आणि समूहांच्या सक्षमीकरणाचं उद्दिष्ट साध्य करण्यासाठी अभ्यासाचं साहित्य सहज आणि वाजवी दरात पोहचवण्याची सेवा सरकार देत आहे, असं ज्योतिरादित्य शिंदे म्हणाले.

**<><><><>**

मुंबईत येत्या १ मे पासून ४ मे पर्यंत आयोजित वेव्हज, अर्थात जागतिक दृक् श्राव्य मनोरंजन शिखर परिषदेचं उद्घाटन १ मे रोजी प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या हस्ते होणार आहे, उद्योग मंत्री उदय सामंत यांनी आज वार्ताहर परिषदेत ही माहिती दिली.

या कार्यक्रमाचे यजमानपद महाराष्ट्र शासनाकडे आहे. या कार्यक्रमात विविध क्षेत्रांमधले परिसंवाद, राउंड टेबल कॉन्फरन्स, आणि सांस्कृतिक कार्यक्रम यांचा समावेश असेल. हिंदी, मराठी, तामीळ चित्रपटसृष्टीतले अनेक दिग्गज कलाकार आणि निर्माते कार्यक्रमात सहभागी होणार असल्याचं सामंत यांनी सांगितलं. हा कार्यक्रम महाराष्ट्राच्या सांस्कृतिक, औद्योगिक आणि पर्यटन क्षेत्राला जागतिक स्तरावर नेण्याची संधी आहे. त्साठी राज्य शासनाला सर्वांचे सहकार्य अपेक्षित आहे, असे आवाहनही उदय सामंत यांनी केलं. जगभरातले अनेक मान्यवर यावेळी उपस्थित राहणार आहे, असं मुख्यमंत्री देवेंद्र फडनवीस म्हणाले…

**होल्ड - मुख्यमंत्री…**

<><><><><>

वेव्ह्ज २०२५ परिषदेमुळे देशातल्या तरुणांना खूप लाभ होईल, असं प्रतिपादन माहिती आणि प्रसारण राज्यमंत्री डॉ. एल. मुरुगन यांनी एका लेखाद्वारे केलं आहे. वेव्ह्जच्या केंद्रस्थानी आजची तरुणाईच असून कौशल्यविकास, स्वयंउद्योजकता आणि जागतिक सहकार्य क्षेत्रातल्या नव्या वाटा यामुळे खुल्या होतील, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. देशातला माध्यम आणि मनोरंजन उद्योग आज अडीच ट्रिलियन रुपयांपेक्षा जास्त असून सर्जनशीलता, नवोन्मेष आणि स्वयंउद्योजकता क्षेत्रात जगाचं नेतृत्व करायचं भारताचं ध्येय वेव्ह्ज २०२५ मधून अधोरेखित होईल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

<><><><><>

वेव्ह्जच्या पहिल्या दिवशी ‘वेव्ह्ज ऑफ इंडिया’ या विशेष अल्बमचं प्रकाशन होणार आहे. या अल्बममध्ये एकंदर पाच गाणी असतील. प्रख्यात संगीतकार एम. एम. कीरवाणी, ए. आर. रहमान, गायक-संगीतकार शंकर महादेवन आणि गीतकार प्रसून जोशी ही जोडी, संगीतकार रिकी केज आणि मीत ब्रदर्स असे, पाच वैशिष्ट्यपूर्ण संगीतशैलीचे कलाकार यासाठी एकत्र आले आहेत.

<><><><><>

देशातल्या शेअर बाजारांनी आज जोरदार तेजी नोंदवली आणि शुक्रवारी झालेल्या घसरणीनं झालेलं नुकसान भरुन काढलं. दिवसअखेर सेन्सेक्स १ हजार ६ अंकांनी वाढून ८० हजार २१८ अंकांवर बंद झाला.  निफ्टी २८९ अंकांची वाढ  नोंदवत २४ हजार ३२९ अंकांवर बंद झाला. बँका, धातू, वाहन, आरोग्य क्षेत्रातल्या समभागात मोठी वाढ झाली.

सोनं आज तोळ्यामागे ५०० रुपयांनी स्वस्त झालं आणि २४ कॅरेट सोनं ९८ हजार रुपयाला एक तोळा मिळत होतं. चांदी साडे बाराशे रुपयांनी स्वस्त झाली आणि ९९ हजार रुपयांपेक्षा महाग मिळत होती.

**<><><><><>**

भारताने आज फ्रान्सबरोबर राफेलच्या मरीन प्रकारची २६ लढाऊ विमानं खरेदी करण्यासाठी संरक्षण करार केला. संरक्षण मंत्रालय आणि फ्रेंच सरकारच्या अधिकाऱ्यांच्या उपस्थितीत नवी दिल्लीत या करारावर स्वाक्षरी करण्यात आली. या २६ विमानांपैकी २२ सिंगल सीटर प्रकारची तर उर्वरित ४ डबल सीटर प्रकाराची विमानं आहेत. भारतीय नौदलाच्या गरजेनुसार या विमानांची रचना असेल. ही विमानं भारतीय नौदलाच्या विक्रांत आणि विक्रमादित्य या युद्धनौकांवर तैनात केली जातील.

**<><><><><>**

आयपीएल क्रिकेट स्पर्धेत आज जयपूर इथं राजस्थान रॉयल्स आणि गुजरात टायटन्स यांचा सामना सुरु आहे. राजस्थान रॉयल्सनं नाणेफेक जिंकून प्रथम क्षेत्ररक्षण करायचा निर्णय घेतला आहे.

शेवटची बातमी हाती आली तेव्हा गुजरात टायटन्सच्या ९ षटकात बिनबाद ८७ धावा झाल्या होत्या.

**//<><><><><>//**